# वस्तू व सेवा कर

# Goods and Service Tax- (GST)

## प्रस्तावना

**(Introduction)**

भारतातील कर प्रणालीमध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांना विविध प्रकारच्या कर आकारणीचे अधिकार असल्यामुळे सामान्य नागरिकांसह व्यापारी आणि उत्पादकांनाही एकाच वस्तू व सेवांसाठी अनेक कर भरावे लागत असे. वस्तूच्या उत्पादनाच्या ठिकाणापासून ते ग्राहकांपर्यन्त वस्तू पोहचविण्यासाठी त्या वस्तूची वाहतूक करतांना अनेक टप्प्यांवर कर भरावा लागत असे. त्याचप्रमाणे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाहतूक करतांना सुद्धा अनेक राज्यांच्या सिमेवर असलेल्या नाक्यांवर विविध प्रकारचे कर भरावे लागतात. त्यामुळे बऱ्याचवेळा वेळ, पैसा तर खर्च होतोच परंतु अनेकदा मालाचे नुकसानही होत असे. ही सर्व परिस्थिती बदलण्यासाठी संपूर्ण देशभरात आता कोणत्याही वस्तू व सेवांसाठी एकदाच कर भरावा लागेल.

तेव्हा संपूर्ण देशात एकच करप्रणाली असणे या संकल्पनेतून वस्तू व सेवा कराचा उदय झाला.

## वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.)

वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) Goods & Service Tax हा अप्रत्यक्ष कर असून तो वस्तू व सेवांचे उत्पादन, विक्री आणि वापरावर एकात्मिक पद्धतीने आकारला जातो. भारतात १ जुलै २०१७ पासून संपूर्ण देशात हा कर लागू झाला आहे. वस्तू व सेवा करामुळे यापूर्वीचे विक्रीकर, सेवाकर, एक्साईज कर,

लक्झरी कर, मनोरंजन कर आणि व्हॅट सारखे सर्व कर रद्द झाले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील कर रचनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने उचललेले हे महत्वाचे पाऊल होय. या कर प्रणालीमुळे कर चुकवेगिरीला आळा बसणार आहे. या कर प्रणालीमुळे केंद्र आणि राज्य सरकारला महसूलात समान वाटा मिळणार आहे. जी.एस.टी. कराच्या आकारणीमुळे केंद्र व राज्याच्या ११ प्रकारच्या विविध करांची जागा जी.एस.टी. ने घेतली आहे. केंद्र सरकारच्या कर वसूलीला सी.जी.एस.टी., राज्य सरकारच्या कर वसुलीला एस.जी.एस.टी. असे संबोधण्यात येते. अशा दोन कराव्यतिरिक्त एका राज्यातून दुसऱ्या राज्यात मालाची विक्री करण्यासाठी इंटिग्रेटेड जी.एस.टी. तर संघराज्यासाठी यु.जी.एस. टी. अशा प्रकारे कराची वसूली केली जाणार आहे. भारतात जी.एस.टी. एकाच व्यवहारावर दोन कर भरावे लागतील त्यातील एक भाग केंद्र सरकारचा सी.जी. एस.टी. व दुसरा भाग राज्य सरकारला एस.जी.एस.टी. द्यावा लागेल. या कराची अंमलबजावणी सोपी असून त्यामुळे व्यापारात वाढ होईल तसेच केंद्र व राज्य सरकारच्या महसूलातही वाढ होईल.

## जी.एस.टी. आवश्यकता

भारतातील करप्रणालीत अनेक दोष निर्माण झाले होते. त्यामुळे या सर्व दोषांवर उपाय म्हणून जी.एस.टी. लागू करण्याच्या अगोदर केंद्र व राज्य सरकार अनेक प्रकारची विविध टप्प्यावर कर आकारणी करत असत. त्यामुळे वस्तू व सेवांच्या किमती सतत वाढत होत्या. त्याचप्रमाणे कराची वसुली करणेही कठीण काम होते. या कर प्रणालीत कर चुकवेगिरी, भ्रष्ट्राचार इत्यादीच्या प्रमाणात सुद्धा वाढ झाली होती. वरील सर्व दोष निवारण करण्याच्या दृष्टीकोनातून जी.एस.टी. ची आवश्यकता होती.

## जी.एस.टी.चा इतिहास

आज जगात अनेक देशात वस्तू व सेवा करप्रणाली लागू झालेली आहे. मात्र सर्वप्रथम वस्तू व सेवा कर प्रणाली अंमलात आणण्याचा मान फ्रान्सने मिळवला. फ्रान्समध्ये १९५४ पासून जी.एस.टी. लागू करण्यात आला. कॅनडाने १९०५ मध्येही पद्धत अंमलात आणण्याचा प्रयत्न केला असला तरी कॅनडात १९९१ नंतर जी.एस.टी.ची सुरुवात झाली.

भारतातील पूर्वीची अप्रत्यक्ष करप्रणाली ही दोषपूर्ण असल्याने या प्रणालीद्वारे महसूल गोळा करण्यात अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या. त्यामुळे १९९८ मध्ये केंद्र सरकारच्या पुढाकाराने मूल्यवर्धीत करप्रणाली व्हॅट लागण्याचे ठरविण्यात आले. १९९४ मध्ये नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनांस अँड पॉलिसीने डॉ. अमरीश बागची यांच्या नेतृत्वाखाली अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या आधारावर एम्पावर्ड कमिटी ऑफ स्टेट फायनांस मिनिस्टर यांनी देशात व्हॅट प्रणाली लागू केली. परंतु यातही काही दोष दिसून आले. त्यामुळे केंद्रिय वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी जी.एस.टी. बाबतची धोरणात्मक घोषणा २००६ मध्ये केली. १ एप्रिल २०१७ पासून ती लागू करण्याचे ठरविले गेले होते. मात्र राज्य सरकारांची त्याला संमती न मिळाल्याने तो प्रश्न तिथेच थांबला.

२०१४ मध्ये मोदी सरकार अस्तित्वात आले त्यांनी हे विधेयक ६ मे २०१५ रोजी जी.एस.टी. बील लोकसभेत मांडून मंजूर करुन घेतले. हे विधेयक १२२ व्या घटना दुरुस्तीद्वारे ३ ऑगस्ट २०१६ ला राज्यसभेत व ८ ऑगस्ट २०१६ ला लोकसभेत मंजूर होऊन नवीन करप्रणाली लागू करण्यातील अनेक अडचणी दूर झाल्यात. त्यानंतर १३ एप्रिल २०१७ ला राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जींनी बजट सत्रात संसद सदनात हे विधेयक पारित झाल्यानंतर वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी १ जुलै २०१७ पासून करण्यात आली.

## जी.एस.टी. आकारणीचे स्वरुप

वस्तू व सेवा कराची आकारणी पुढील पाच दरात विभागली गेली.

**१) ०० टक्के जी.एस.टी.**

जीवनावश्यक वस्तूंवर ०० टक्के वस्तू व सेवा कर आकारण्यात आले आहे. उदा. दूध, पीठ, बेसन, ब्रेड, ताज्या भाज्या, पॅक बंद न केलेले अन्नधान्य, दही, अंडी, पॅकबंद न केलेले पनीर, मध, फ्रेश मटन, फिश, चिकन, वर्तमानपत्र, शैक्षणिक सेवा आरोग्य सेवा या वस्तू जी.एस.टी. मधून मुक्त ठेवल्या.

**२) ५ टक्के जी.एस.टी.**

ब्रांडेड फुड उदा. ब्रांडेड पनीर, फ्रोजन भाजी, चहा, कॉफी, मिल्क पावडर, मसाला, केरोसीन, साबुदाणा, रस, कोळसा, औषध, काजू, एल.पी.जी., पादत्राणे (रु. ५०० पर्यंतची) कपडे (रु. १००० पर्यंतची) लहान हॉटेल, अगरबत्ती, रेल्वे तिकीट इत्यादीचा समावेश केला आहे.

**३) १२ टक्के जी.एस.टी.**

सॉस, औषध, फ्रोजन मीट प्रॉडक्ट्स, ड्रायफ्रुट्स, लोणी, तूप, बदाम, पॅकबंद नारळ पाणी, जाम, जेली, लोणचे फळे, शेंगदाणे, छत्री, मोबाईल, शिलाई मशीन, नॉन एसी हॉटेल, सेलफोन, मुरब्बा इत्यादींचा समावेश केला आहे.

**४) १८ टक्के जी.एस.टी.**

कम्पूटर, प्रिंटर, टेलीकॉम सेवा, केश तेल, टूथपेस्ट, साबण, पास्ता, आईस्क्रीम, केक, पेस्ट्रीज, मिनरल वॉटर, आय टी सेवा, ब्रान्डेड गरमेन्ट इत्यादीचा समावेश केला आहे.

**५) २८ टक्के जी.एस.टी.**

यात चॉकलेट, वॉलपेपर, पान मसाला, डिश वॉशर, वॉशिंग मशीन, पेस्ट, डिओडंट, शेवींग क्रिम, मोटर सायकल, फाईव्ह स्टार हॉटेल, क्लब इत्यादींचा समावेश आहे.

## जी.एस.टी.चा परिणाम

जी.एस.टी. म्हणजे भारताच्या अप्रत्यक्ष कर सुधारणा क्षेत्रातील एक महत्वाचे पाऊल होय. उपभोक्त्यांसाठी सर्वात मोठा फायदा म्हणजे उपभोग्य वस्तूंवर आकारल्या जात असलेल्या २५ टक्के ते ३० टक्के कराचे ओझे कमी होईल. त्यामुळे आपल्या देशातील उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत सक्षम होऊन आर्थिक विकासात वाढ होईल.

जी.एस.टी. लागू झाल्यामुळे लॉजिस्टीक, इ-कॉमर्स, ऑटोमोबाईल्स, मनोरंजन या क्षेत्रातील कंपन्यांना फायदा होईल. यापूर्वी राज्याच्या विक्रीकर खात्याकडून उद्योजकास व्हॅट नोंदणीपत्र घ्यावे लागायचे त्यासाठी असणारी प्रत्येक राज्याची पद्धती, शुल्क वेगवेगळे होते. आत जी.एस.टी. नोंदणी प्रक्रिया एक केंद्रिय आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे उद्योजकांना कर भरण्यावर जो खर्च करावा लागत असे तो कमी झाला आहे. डिजीटल कर प्रक्रियेमुळे कर प्रणालीत पारदर्शकता आली आहे.

## वस्तू व सेवा कराची (GST) महत्वाची वैशिष्ट्ये

**(Salient Features of GST)**

१) वस्तू व सेवा हा दुहेरी कर असून तो केंद्रात व राज्यात एकाच वेळी समान कराच्या आधाराने लावण्यात येणारा कर आहे. केंद्राने आकारलेला

केंद्रिय वस्तू व सेवा कर (CGST) व राज्याने आकारलेला कर राज्य वस्तू व सेवा कर (SGST) या नावाने ओळखले जातात.

२) वस्तू व सेवा करांच्या अंतर्गत वस्तूंच्या व सेवांच्या पुरवठ्यावर हा कर आकारण्यात

येतो.

३) वस्तू व सेवा करांच्या अंमलबजावणीची यंत्रणा ही ऑनलाईन आहे.

४) तंबाखू व तंबाखूपासून तयार केलेली उत्पादने GST च्या कक्षेत येतात.

५) वस्तू व सेवा यांची निर्यात ही करदेय असणार नाही.

६) नवीन अर्ज करणाऱ्या अर्जदारांना ऑनलाईन अर्ज करुनच स्वत:ची नोंदणी करावी लागेल.

७) वस्तू व सेवा कर नेटवर्कची स्थापना ही माहिती तंत्रज्ञानाची मूलभूत यंत्रणा म्हणून करण्यात आली.

८) केंद्रिय वस्तू व सेवा ह्यावरील करांमुळे मिळालेल्या निविष्ट कराच्या जमेचे उपयोजन राज्य वस्तू व सेवांवरील कराची जमा मात्र केंद्रिय वस्तू व सेवा कर आणि राज्य वस्तू व सेवा कर भरण्यासाठी वापरण्यात येऊ शकते.

९) ज्या कर भरणाऱ्या व्यापाराच्या व्यापाराची उलाढाल १५ कोटी रु. पेक्षा जास्त व ५ कोटी रु. पेक्षा कमी त्यांना २ अंकी कोड वापरावा लागेल. ज्या व्यापाराच्या व्यापाराची उलाढाल ५ कोटी रु. किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्यांनी ४ अंकी कोड वापरावा व १.५ कोटी पेक्षा कमी व्यापाराची उलाढाल असणाऱ्यांना कोडची आवश्यकता नाही.

## वस्तू व सेवा करा (GST) मध्ये अंतर्भूत होणारे कर

केंद्र शासनाद्वारे आकारले जाणारे व केन्द्र सरकारकडे जमा होणारे कर.

१) केंद्रिय उत्पादन शुल्क

२) उत्पादन शुल्क (औषधे व प्रसाधन शुल्क)

३) अतिरिक्त उत्पादन शुल्क (विशेष महत्वाचा विक्री माल)

४) अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व कपड उत्पादने)

५) अतिरिक्त सीमा शुल्क (सी व्ही डी)

६) विशेष अतिरिक्त सीमा शुल्क (एस ए डी)

७) सेवा कर

८) वस्तू व सेवा पुरवठा याबाबतचा केंद्रिय अधिभार व उपकर

## राज्य सरकारद्वारे आकारण्यात येणाऱ्या खालील करांचा GST मध्ये समावेश करण्यात आला.

१) राज्य शासन मूल्यवर्धित कर

२) केंद्रिय विक्री कर

३) सर्व प्रकारचे प्रवेश कर

४) जाहीरातीवर आकारण्यात येणारा कर

५) खरेदी कर

६) विदेशी वस्तूंवर लावण्यात येणारे कर

७) लॉटरी, जुगार इत्यादींवर कर

८) वस्तू व सेवा पुरवठ्याशी संबंधित राज्य शासनाचे अधिभार व उपकर

९) मनोरंजन व करमणुकीच्या साधनांवरील कर

१०) वन विकास कर (वन उपजांच्या विक्रीवरील कर)

## GST च्या कक्षेबाहेरील कर

१) मूलभूत सीमा शुल्क

२) निर्यात कर

३) रस्ते व प्रवासी कर

४) टोल कर

५) प्रॉपर्टी कर

६) मुद्रांक शुल्क

७) वीज कर

## जी.एस.टी.चे फायदे

देशाला जी.एस.टी. मुळे खालील लाभ होणार

१) देशाच्या जी.डी.पी.मध्ये वाढ होईल व त्यामुळे देशाचा विकास होण्यास मदत

होईल.

२) एकच कर असल्यामुळे करात पारदर्शकता येईल कर भरण्याच्या, आकारण्याच्या

पद्धतीत सहजता आणि सुलभता येईल.

३) संपूर्ण देशात वस्तू व सेवांची किंमत एकसारखी असल्यामुळे राज्याराज्यांमध्ये व

ग्राहकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही.

४) जी.एस.टी. मुळे वस्तू व सेवांची किंमती समान राहतील त्याचा फायदा निश्चितच

ग्राहकांना होईल.

५) जी.एस.टी. मुळे उत्पादक कंपन्यांना फायदा देशात एकसंघ बाजारपेठ तयार होईल.

६) देशात कराची चोरी करणे किंवा कर न भरणे याचे प्रमाण कमी होईल.

७) जी.एस.टी. मुळे व्यावसायिकांना वेगवेगळे कर द्यावे लागणार नाही. त्यामुळे

व्यावसायिकांच्या वेळेची बचत होईल.

८) ज्या उत्पादकांची वार्षिक उत्पादकता २० लाख रुपयांपर्यंत आहे अशा उद्योगांना जी.

एस.टी. मधून मुक्त करण्यात आल्याने त्याचा फायदा लहान उद्योगांना होईल.

९) पहिली तीन वर्षे राज्यांना १०० टक्के भरपाई दिली जाईल नंतर चौथ्या वर्षाला ७५

टक्के, पाचव्या वर्षाला ५० टक्के भरपाई दिली जाईल.

१०) ज्या राज्यांना महसूलात तोटा होईल त्या राज्यांचा महसूलातील तोटा ५ वर्षे केंद्र

सरकार भरुन देईल. तसेच ज्या राज्यात ग्राहक वर्ग मोठा आहे त्या राज्यांच्या

करातील वाटा मोठा राहील.

११) जी.एस.टी. मुळे विविध प्रकारच्या वस्तूंचे साधे आणि सोपे वर्गीकरण झाले

असल्यामुळे कर लावतांना कोणत्याही वस्तूचे वर्गीकरण वादग्रस्त ठरणार नाही.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१) जी.एस.टी. म्हणजे काय? ते सांगून त्याचे स्वरुप व फायदे स्पष्ट करा.

२) जी.एस.टी. म्हणजे काय? ते सांगून त्याची आवश्यकता, स्वरुप व परिणाम स्पष्ट करा.

### लघुत्तरी प्रश्न

१) जी.एस.टी. म्हणजे काय?

२) जी.एस.टी. ची आवश्यकता का आहे?

३) जी.एस.टी. चे स्वरुप थोडक्यात सांगा.

४) जी.एस.टी. चा परिणाम स्पष्ट करा.

५) जी.एस.टी. चे कोणतेही पाच फायदे सांगा.

६) जी.एस.टी. ची वैशिष्ट्ये सांगा.